# प्रारंभिक अधिसूचना

क्र.कावि/वशी/उजि.भूस/म.प्र/235/२०१६
उपजिल्हाधिकारी भुसंपादन म.प्र.बुलडाणा.
जावक क्र 235/२०१६
दिनांक: १९/१०/२०१६

## भुमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना.

ज्याअर्थी भूमिसंपदन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (३० of २०१३) च्या कलम ३ मधील पोट कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसुल व वनविभाग अधिसूचना क्रमांक **MIS-11/2014/C.R.77/A-2** दिनांक १९ जानेवारी २०१५ (यानंतर यापूढे याला सदर्हु कलम ३ मधील पोटकलम (झअ) नुसार) जिल्ह्यातील १०००० हेक्टर पेक्षा जास्त नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना या कायद्या अंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी या अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणुन घोषित करण्यांत आले आहे, त्याअर्थी अनुसूची I मध्ये दर्शविलेल्या जमिनी (या पुढे या "उक्त भूमी" उल्लेख असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी बुलडाणा यांची समुचित शासन म्हणुन खात्री झाल्यामुळे सदर्हु कायद्याच्या कलम ११ च्या पोटकलम १ नुसार सार्वजनीक कामाचे प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते असे अधिसूचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी सदर्हु भूमिसंपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादित करताना भुधारकाला विस्थापीत करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची III मध्ये नमूद केलेले आहे.

आणि ज्याअर्थी भूमिसंपादन कायद्याअंतर्गत सार्वजनीक प्रयोजनार्थ भुमिसंपादन करताना सामाजीक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची IV मध्ये नमूद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी भूमिसंपादन कायद्याचे कलम ४३ पोट कलम (१) नुसार विस्थापीतांचे पुनर्वसन व पुर्नस्थापना करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसूची V मध्ये प्रशासकाचे विवरण नमूद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्क असल्यास अनुसूची V मध्ये माहीती देणे आवश्यक आहे.)

त्याअर्थी सदर्हु कायद्याच्या कलम ११ चे पोट कलम (४) नुसार अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून सदर्हु भुमी कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमीनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचीत केलेल्या भूमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अंमलबजावणी मधून अशा भुमी मालकास सूट देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे, तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतीची जिल्हाधिकारी द्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदर्हु भुमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियम" असा करण्यात येईल) चे नियम १० उपनियम (३) अन्वये भूमिअभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

त्याअर्थी सामुचित शासन म्हणुन जिल्हाधिकारी सदर्हु कायद्याचे कलम ३ पोट कलम (ग) अन्वये उपजिल्हाधिकारी भुसंपादन म.प्र. बुलडाणा यांना जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत करीत आहे.

भू.स.प्र.क्र. ४८/१९९८-९९ मौजे जानेफळ ता मेहकर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४३ | ०.९३ | २६ | ३७३ | ०.६९ |
| २ | ४४ | ०.२३ | २७ | ३५८ | ०.५८ |
| ३ | ४५ | ०.१५ | २८ | ३५७ | १.१६ |
| ४ | ४७ | ०.०७ | २९ | ३३९ | ०.०७ |
| ५ | ४७ | ०.१२ | ३० | ३३९ | ०.१५ |
| ६ | ४७ | ०.१४ | ३१ | ३३९ | ०.१४ |
| ७ | ४७ | ०.२७ | ३२ | ३४० | ०.३१ |
| ८ | ४८ | १.०८ | ३३ | ३४० | ०.३१ |
| ९ | ४९ | ०.०१ | ३४ | ३४० | ०.३९ |
| १० | ६० | ०.९३ | ३५ | ३४० | ०.३१ |
| ११ | ५० | २.६० | ३६ | ३४० | ०.२६ |
| १२ | ७ | ०.३७ | ३७ | ३२४ | ०.६७ |
| १३ | ९ | ०.५४ | ३८ | ३२३ | ०.४२ |
| १४ | ११ | ०.३४ | ३९ | ३२२ | ०.७९ |
| १५ | १० | ०.६९ | ४० | ३२१ | ०.१४ |
| १६ | १३ | ०.०५ | ४१ | ३१९ | ०.४७ |
| १७ | ५१० | ०.२२ | ४२ | ३२० | ०.४२ |
| १८ | ५०९ | ०.१८ | ४३ | १६७ | १.०४ |
| १९ | ५०८ | ०.२५ | ४४ | १६६ | ०.२५ |
| २० | ५१४ | ०.२५ | ४५ | १७० | २.०३ |
| २१ | ५१३ | ०.३३ | ४६ | १७० | ०.३० |
| २२ | ४५२ | १.३६ | ४७ | १७० | ०.२१ |
| २३ | ५०२ | १.०२ | ४८ | १७० | ०.२१ |
| २४ | ५०३ | ०.०३ | ४९ | १६५ | ०.०८ |
| २५ | ४५१ | ०.३९ | ५० | ४५० | ०.०७ |

भू.स.प्र.क्र. ४८/१९९८-९९ मौजे जानेफळ ता मेहकर

| | | | |
|---|---|---|---|
| एकुण क्षेत्र स्तंभ क्र ०१ | १२.५५ हे· आर | एकुण क्षेत्र स्तंभ क्र ०२ | ११.४७ हे· आर |
| स्तंभ क्र १ + स्तंभ क्र २ | | एकुण क्षेत्र | २४.०२ हे· आर |
| संपादनाचे प्रयोजन | पेनटाकळी प्रकल्पाच्या शाख कालव्याकरीता | | |

## अनुसूचि II

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नांव :- पेनटाकळी प्रकल्प

प्रकल्पाचे कामाचे विवरण :- पेनटाकळी प्रकल्पाच्या शाखा कालव्याकरीता

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे (आर्थिक, रोजगार, पायाभुत सुविधा व इतर) :- सिंचन क्षेत्र निर्मीती.

## अनुसूचि III

प्रकल्प बाधितांना विस्थापित करणे आवश्यक असल्याबाबतची कारणे. :-. निरंक

## अनुसूचि IV

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश :- नवीन भूसंपादन कायदा २०१३ कलम (६) मध्ये अॅन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातुन सुट आहे.

## अनुसूचि V

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी सार्वजनिक पाणीपुरवठा उद्योगधंदांना पाणीपुरवठा होणार आहे त्याचबरोबर ग्रामीण भागामधे रोजगार निर्मीती होणार असून ग्रामीण भागातिल कष्टकरी शेतकरी भूमीहिन शेतमजूर यांना रोजगारांना संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनस शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरच्या प्रकल्प हा अनुशेषग्रस्त जिल्यातिल दृष्काळ प्रणव क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दूर्गम शेतजमीनीवर असून यामधे वस्ती अथवा गावठाण बाधीत होत असल्यामुळे पुर्नवसन करण्याची आवश्यकता आहे. सबब प्रशासक नियुक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) अधिकाऱ्याचे नाव पदनाम :- उपजिल्हाधिकारी पुर्नवसन विभाग बुलडाणा

ब) अधिकाऱ्याचा कार्यालयीन पत्ता :- जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा

क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यांत आली त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण. (निर्गमीत करण्यापूर्वी भरावे) :- महसूल व वनविभाग यांची अधिसूचना क्रमांक आरपीए-२०१५/प्रक्र१२९(२)/र-१ दिनांक १० जुन २०१५

विशेष नोंद :- भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी भूसंपादन म.प्र. बुलडाणा यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**अधिकाची न्यायलयीन प्रकरणांची माहिती :-** भु.स.प्र.क्र. ४८/१९९८-९९ मौजे जानेफळ ता. मेहकर प्रकरणामधील भुसंपादन संस्थेने केलेले मा. सर्वोच्च न्यायालयातील स्पेशल लिव्ह अपिल क्रमांक २१०७/२००७ हे खारीज केले असुन मा. उच्च न्यायालय नागपुर येथे न्यायनिर्णय झालेली W.P.No.४८५८ यांचा न्यायनिर्णय कायम ठेवला आहे. सदर प्रकरणात गट क्र. ३६४ मधील काशिनाथअप्पा रानअप्पा मिटकारी यांचे क्षेत्र ०.७० आर ला यापुर्वी मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये सदरहु कास्तकारास या कार्यालयाने दिनांक २७.०९.२००६ रोजी अवार्ड पारीत करुन वाढिव मोबदला अदा केला आहे. सदर कास्तकारास मा. न्यायालयाने दिलेल्या लाभामुळे सदर प्रकरणातील कलम ११ मधुन सदरचे क्षेत्र हे वगळण्यात येत आहे. सदर प्रकरणात या कार्यालयाने विधी अधिकारी बुलडाणा यांचे अभिमत सुध्दा घेतले आहे.